रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर विद्याप्रबोधिनी मार्फत राबविण्यात येणा—या विविध उपक्रमांचा शिक्षकांच्या व्यावसायिक क्षमता विकसनावर होणारा परिणाम — एक अभ्यास.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे शिक्षणशास्त्र विषयात आंतरविद्याशाखेत अंतर्गत पीएच.डी. पदवीच्या अंशतः पूर्ततेसाठी सादर केलेला संशोधन आराखडा

संशोधक

उदयकुमार अरुण सांगळे

मार्गदर्शक

डॉ. गौतम रामचंद्र गायकवाड

संशोधन केंद्र

शिक्षणशास्त्र संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
नांदेड

अनुक्रमणिका

अ. क्र.	तपशील	पृष्ठ क्रमांक
१	प्रस्तावना	१
२	संशोधनाची गरज	५
३	संशोधनाचे महत्त्व	६
४	समस्या विधान	६
५	कार्यात्मक व्याख्या	६
६	गृहीतके	७
७	संशोधनाची उद्दिष्टे	७
८	संशोधनाची व्याप्ती	८
९	संशाधनाची मर्यादा	८
१०	संशोधनाची परिमर्यादा	८
११	संशोधन पध्दती	९
१२	जनसंख्या आणि नमुना निवड	१०
१३	माहिती संकलनाची साधने	११
१४	संख्याकीय परिमाणे	११
१५	कार्यवाही	१२
१६	वेळापत्रक	१२
१७	अंदाजपत्रक	१३
१८	संदर्भ ग्रंथ सूची	१३
१९	संशोधक व मार्गदर्शकाचे नांव व सही	१३

१ .प्रस्तावना —

समाजात शिक्षण ही प्रक्रिया रुजली आहे. शाळेतला शिक्षण घेणारा विद्यार्थी आपलाच आहे. त्यामुळे त्याच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षक या नात्याने आपण सर्वांनी मिळून झटले पाहीजे. ते आपले एक कर्तव्य आहे. एक जबाबदार नागरिकत्व, जाणीव जागृती, जबाबदारीची भावना या अर्थाने शिक्षण प्रक्रियेत समाजातील प्रत्येक घटकाचा सहभागही महत्त्वपूर्ण आहे. त्याचप्रमाणे शिक्षकाला कोणत्या स्वरुपाचे काम करावे लागणार असते व त्यासाठी त्याच्या गरजा काय असतात. शिक्षक प्रशिक्षण पूर्ण केल्यावर त्याच्या ज्ञानात बदल होण्यापेक्षा कार्यमानात अपेक्षित सुधारणा होणे आवश्यक आहे.

शिक्षकाच्या व्यावसायिक क्षमता निश्‍चित करणे व त्या विकसित करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे असा प्रवाह नव्यानेच शिक्षणक्षेत्रात येत आहे. शिक्षक हा शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याच्या प्रक्रियेतील सर्वात प्रभावी घटक मानला जातो. त्यादृष्टीने शिक्षकांची क्षमता वाढविणे गरजेचे आहे. एक व्यावसायिक या दृष्टीने त्यांच्या दृष्टीने त्यांच्या बौध्दीक आणि भावनात्मक विकास घडवून आणणे हीच शालेय गुणवत्ता वाढविण्याच्या गुरुकिल्ली आहे. प्रत्येक व्यक्ती स्वत:हून खूप ज्ञान प्राप्त करु शकते आणि त्यावर विचार व चिंतन करुन, कल्पकतेची जोड देउन आपले अंगीकृत कार्य अधिक चांगल्या प्रकारे करता यावे दृष्टिकोनातून शिक्षकांमधील क्षमतांचा विचार महत्त्वाचा ठरतो.

राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेने (NCTE) नमूद केलेल्या दहा क्षमता पुढीलप्रमाणे आहेत.

१. संदर्भ क्षमता (Contexual Competencies),

२. संबोध क्षमता (Conceptual Competencies),

३. आशयज्ञान क्षमता (Content Knowledge Competencies),

४. शैक्षणिक व्यवहार क्षमता / अध्यापनक्षमता (Transactional Competencies),

५. शैक्षणिक उपक्रम क्षमता (Competencies Related to other Education Activities),

६. शैक्षणिक साहित्य निर्मिती व वापर क्षमता (Competencies Related to Teaching and Learning Material),

७. मूल्यमापन क्षमता (Evaluation Competencies),

८. व्यवस्थापन क्षमता (Management Competencies),

९. पालक सहकार्य क्षमता (Competencies Related to Parental Co-operation),

१०. समाज सहकार्य क्षमता (Competncies Related to Co-operation with Community)

शाळेतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता हाच एकच ध्यास. या उक्तीने प्रेरित होउन समाजातील प्रत्येक व्यक्ती प्रयत्नशील आहे. शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे दीर्घकालिन व अल्पकालिन नियोजनामध्ये गावातील सामाजिक संस्था, शिक्षण संस्था तसेच इतर लोकांचादेखील सहभाग असणे हे फायदेशीर ठरते.

कर्मवीर आण्णांनी स्थापन केलेली रयत शिक्षण संस्थादेखील याला अपवाद नाही. रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर विद्याप्रबोधिनीअंतर्गत एकूण २४ प्रकल्प चालविले जातात. कर्मवीर विद्याप्रबोधिनीअंतर्गत चालविल्या जाणा—या

प्रकल्पांची यादी —

१. परीक्षा विभाग,

२. स्पर्धा परीक्षा विभाग,

३. रयत प्रज्ञा शोध परीक्षा,

४. स्पोकन इंग्लिश,

५. कला अकादमी

६. क्रीडा अकादमी,

७. नापासांची शाळा,

८. मिलिटरी पॅरामिलिटरी प्रशिक्षण,

९. दृकश्राव्य विभाग,

१०. प्रकाशन विभाग,

११. मॅकमिलन इंडिया रयत प्रकाशने,

१२. वक्तृत्व स्पर्धा,

१३. प्रश्नमंजुषा स्पर्धा,

१४. शॉट टर्म कोर्सेस,

१५. रयत गुरुकुल,

१६. सी.ई.टी.प्रकल्प,

१७. रयत नॉलेज बॅंक,

१८. रयत मेसेंजर,

१९. इंग्लिश मिडिअम स्कूल,

२०. मोबाईल सायन्स व्हॅन,

२१. रयत ऑलिंपियाड,

२२. अर्काईव्हज विभाग,

२३. E-Rayat 2,

२४. करिअर गाइडन्स विभाग.

शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे हे ओळखून सामान्य जनतेच्या शिक्षणासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ४ ऑक्टोबर १९१९ रोजी काले, जि.सातारा येथे रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. शिक्षण प्रसार व समाजप्रबोधन यासाठी कर्मवीरांनी हयात वेचली. सर्वांना शिक्षणाची समान संधी लाभली पाहिजे. या ध्येयाने प्रेरित होउन जात, गोत, धर्म, पंथ इत्यादी सामाजिक भेद नष्ट करुन समता, बंधुता व मानवता याकडे स्वावलंबनाने वाटचाल सुरु केली. उत्कृष्टाकडे वाटचाल करण्याच्या दृष्टीने कर्मवीर विद्याप्रबोधिनी अंतर्गत १९७४ पासून आजतागायत विविध प्रकल्पांचे वा प्रशिक्षणांचे नियोजन, आयोजन व अंमलबजावणी केली जाते. त्याचा शिक्षकांच्या व्यावसायिक विकसनासाठी काय फायदा होतो आहे हे अभ्यासणे गरजेचे आहे.

२.संशोधनाची गरज —

रयत शिक्षण संस्थेचा व्याप महाराष्ट्रभर आहे. विद्यार्थ्यांच्या हितासाठी शिक्षकांच्या विकासासाठी संस्थांतर्गत विविध उपक्रमांचे वा प्रशिक्षणाचे नियोजन

केले जाते. शिक्षकांच्या विकसनासाठी त्याचा लाभ मिळतो का, त्यांची व्यावसायिक प्रगती होते का ? हे अभ्यासण्याच्या दृष्टीने संशोधकास प्रस्तुत संशोधनाची गरज भासली.

३.संशोधनाचे महत्त्व —

प्रस्तुत संशोधनामुळे शिक्षकांच्या क्षमता विकासास चालना मिळेल. त्याचबरोबर त्यांच्या व्यक्तिगत विकासाच्या दृष्टीने फायद्याचे होईल.

शिक्षकांना कर्मवीर विद्याप्रबोधिनीच्या प्रकल्पांची खोली समजेल. त्याचे महत्व समजेल. प्रकल्प व्यवस्थितपणे राबविण्याच्या दृष्टीने शिक्षकांस ज्ञान प्राप्त होईल.

शाळेच्या विकासास, शिक्षकांच्या विकासास, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढ सर्वच दृष्टीने शाळेच्या प्रगतीत भर पडेल. यादृष्टीने संशोधनास महत्त्व आहे.

४.समस्या विधान —

“रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर विद्याप्रबोधिनी मार्फत राबविण्यात येणा—या विविध उपक्रमांचा शिक्षकांच्या व्यावसायिक क्षमता विकसनावर होणारा परिणाम : एक अभ्यास.”

५.कार्यात्मक व्याख्या —

१. **रयत शिक्षण संस्था** — आशिया खंडातील अनेक विविध शैक्षणिक संस्थांपैकी नावाजलेली, विविध उपक्रम राबविणारी एक मोठी शैक्षणिक संस्था म्हणजे रयत शिक्षण संस्था होय.

२. **कर्मवीर विद्याप्रबोधिनी** — रयत शिक्षण संस्थेच्या विविध शाखांमध्ये विविध प्रकल्प राबविण्यासाठी निर्माण केलेली एक शाखा म्हणजे कर्मवीर विद्याप्रबोधिनी होय.

३. **क्षमता** — प्रत्येक माणसामध्ये उपजत गुण व सुप्त शक्ती यांचा भरणा असतो. त्यांचे रुपांतर दृश्य उपयोगितेत होते तेव्हा त्या प्रक्रियेस क्षमता असे म्हणतात.

४. **परिणाम** — ध्येय प्राप्तीसाठी विविध प्रयत्न करुन घडवून आणलेला बदल म्हणजे परिणाम होय.

६. गृहीतके —

१. रयत शिक्षण संस्था ही गुणवत्तेच्या दृष्टीने कार्य करते.

२. प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या व्यावसायिक क्षमता विकसनासाठी प्रशिक्षणाची आवश्यकता असते.

३. कर्मवीर विद्या प्रबोधिनीअंतर्गत विविध प्रकल्पांच्या कार्यवाहीमुळे शाळेचा दर्जा उंचावतो.

४. विविध प्रकल्पांच्या/प्रशिक्षणांच्या कार्यवाहीमुळे शिक्षकांच्या व्यावसायिक क्षमता विकसनास हातभार लागतो.

७. संशोधनाची उद्दिष्टे —

१. रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर विद्याप्रबोधिनी मार्फत शिक्षकांच्या व्यावसायिक क्षमता विकसनासाठी राबविण्यात येणा—या विविध उपक्रमांचा व प्रशिक्षणांचा शोध घेणे.

२. शिक्षकांच्या व्यावसायिक क्षमता तपासण्यासाठी ‘शिक्षक व्यावसायिक क्षमता मापिका‘ विकसित करणे.

३. कर्मवीर विद्याप्रबोधिनी मार्फत राबविण्यात येणा—या विविध उपक्रमांचा शिक्षकांच्या व्यावसायिक क्षमता विकासावर होणारा परिणाम अभ्यासणे.

४. शहरी, ग्रामीण, पुरुष, स्त्री, प्राथमिक, माध्यमिक या चलानुसार शिक्षकांच्या व्यावसायिक क्षमता विकासावर होणारा परिणाम अभ्यासणे.

८. संशोधनाची व्याप्ती —

१. प्रस्तुत संशोधन हे सातारा जिल्हयातील रयत शिक्षण संस्थेच्या शाळांशी संबंधित आहे.

२. प्रस्तुत संशोधन हे सातारा जिल्हयातील रयत शिक्षण संस्थेच्या शाळांतील शिक्षकांच्या व्यावसायिक क्षमता विकसनाशी संबंधित आहे.

३. प्रस्तुत संशोधन हे कर्मवीर विद्याप्रबोधिनीअंतर्गत उपक्रमांशी व प्रशिक्षणाशी संबंधित आहे.

९. संशोधनाची मर्यादा —

१. प्रस्तुत संशोधनात सातारा जिल्हयातील केवळ रयत शिक्षण संस्थेतील शिक्षकांचाच विचार केला जाईल, इतर कोणत्याही शैक्षणिक संस्थांचा विचार केला जाणार नाही.

२. प्रस्तुत संशोधनात रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर विद्याप्रबोधिनीअंतर्गत असणा—या प्रकल्पांचा विचार केला जाईल. अन्य कोणत्याही प्रकल्पांचा वा योजनांचा विचार केला जाणार नाही.

३. प्रस्तुत संशोधनात कर्मवीर विद्याप्रबोधिनीअंतर्गत असणा—या शिक्षकांच्या व्यावसायिक क्षमतांचाच विचार केला जाईल. अन्य कोणत्याही बाबींचा विचार केला जाणार नाही.

४. प्रस्तुत संशोधन हे २०२१ ते २०२३ या कालखंडापुरते मर्यादीत आहे.

१०. संशोधनाची परिमर्यादा —

१. सातारा जिल्हयामध्ये रयत शिक्षण संस्थेच्या प्राथमिक शाळांमध्ये ३७ तर माध्यमिक शाळामध्ये कार्यरत शिक्षक संख्या १०३१ शिक्षक संख्या आहे. त्यापैकी प्रस्तुत संशोधन हे केवळ ५०० निवडक शिक्षकांपुरतेच मर्यादीत आहे.

२. प्रस्तुत संशोधन कर्मवीर विद्याप्रबोधिनीअंतर्गत प्राथमिक शाळा व माध्यमिक शाळेमध्ये कार्यरत असणा—या शिक्षकांपुरतेच मर्यादीत आहे.

३. प्रस्तुत संशोधन हे सातारा जिल्हयातील रयत शिक्षण संस्थेच्या शाळांपुरतेच मर्यादीत आहे.

४. प्रस्तुत संशोधन हे २०२२—२०२३ या शैक्षणिक वर्षात कार्यरत असणा—या शिक्षकांपुरतेच मर्यादीत आहे.

११. संशोधन पध्दती —

संशोधन व्याख्या — १. वैज्ञानिक पध्दतीचा अवलंब करुन माहितीचे विश्लेषण करण्याची अधिक औपचारिक, व्यवस्थित व तीव्र प्रक्रिया म्हणजे संशोधन होय.

२. संशोधन ही अत्यंत सुव्यवस्थित कृती असून तिचे उद्‌दिष्ट शोध घेणे व ज्ञानाचा विकास करणे हे असते.

शैक्षणिक संशोधन ओळख, डॉ. हेमलता पारसनीस, नित्य नूतन प्रकाशन, ऑक्टोबर २०१०

संशोधनाची उद्‌दिष्टे, माहिती, संकलनाची साधने, इत्यादी अनेक प्रकारच्या आधारावर शैक्षणिक संशोधन पध्दतीचे वर्गीकरण करण्यात येते. त्यासाठी योग्य संशोधन पध्दतीची निवड करावी लागते.

प्रस्तुत संशोधन हे प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर विद्याप्रबोधिनीअंतर्गत प्रकल्प/प्रशिक्षणे हे वर्तमानकाळातील निगडीत असल्यामुळे यामध्ये सद्यस्थितीचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाने सर्वेक्षण संशोधन पध्दतीची निवड केली आहे. उद्‌दिष्ट क्र.३ च्या संदर्भाने समतुल्य गट तयार करुन प्रायोगिक पध्दतीने व्यावसायिक क्षमतांवर होणारा परिणाम अभ्यासला जाईल. प्रत्येक गटात ६० शिक्षकांचा नमुना म्हणून यादृच्छिक पध्दतीने निवडून समावेश केला जाणार आहे.

१२. जनसंख्या आणि नमुना निवड —





जनसंख्या — सातारा जिल्हयामध्ये रयत शिक्षण संस्थेच्या शाळांमध्ये एकूण प्राथमिक शाळा ४ असून त्यामधील शिक्षक संख्या ३७ तर ९४ माध्यमिक शाळांमधील शिक्षक संख्या १०३१ आहे. ही प्रस्तुत संशोधनासाठी जनंसख्या आहे.

नमुना व्याख्या — १. आधुनिक संशोधन प्रक्रियेत नमुना हे एक आवश्यक अंग आहे, इतके की प्रत्येक समाजशास्त्रज्ञाने नमुना चाचणीचे तर्कशास्त्र व त्याची मूलभूत तंत्रे समजून घेतली पाहिजेत. — गुड आणि हॅट

२.ज्या समग्रातून नमुना निवडलेला असतो त्या समग्राचे लहान चित्र म्हणजे नमुना होय. —पॉलीन यंग

३. मान्य झालेल्या संख्याशास्त्रीय पध्दतीनुसार समग्रातून काही भाग निवडला असेल तरच नमुना चाचणीचा योग्य वापर करता येईल. —मोझर व काल्टन

सामाजिक संशोधन पध्दती, प्रा.डॉ.सुनील मायी, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, नोव्हेंबर २००८

प्रस्तुत संशोधनामध्ये माहिती गोळा करण्यासाठी संशोधन समस्येशी सर्व घटकांना सामावून घेणे अशक्य असले तरी ब—याच वेळा ते अत्यंत त्रासदायक ठरते. त्यामुळे प्रतिसादकातून प्रातिनिधीक स्वरुपात आवश्यक प्रमाणात प्रतिसादकाची निवड करावी लागते.

प्रस्तुत संशोधनासाठी सातारा जिल्हयात एकूण ११ तालुके असून त्यापैकी २ तालुक्यांमध्ये रयत शिक्षण संस्थेच्या प्राथमिक विभागाकडील शाळांची संख्या ४ तर १० तालुक्यांमधील माध्यमिक विभागाकडील शाळांची संख्या ९४ असून शाळांची निवड स्तरीकृत नमुना निवड पध्दतीने केली जाईल. महाबळेश्वर तालुक्यामध्ये रयत शिक्षण संस्थेची एकही शाळा नाही. तसेच ४ शाळांमधील प्राथमिक शिक्षक संख्या ३७ व ९४ माध्यमिक शाळांमधील शिक्षक संख्या १०३१ आहे. त्यापैकी दोन्ही मिळून ५०० शिक्षकांची निवड लॉटरी पध्दतीने प्रस्तुत संशोधनासाठी करण्यात येईल.

१३. माहिती संकलनाची साधने —

प्रस्तुत संशोधनात माहिती संकलनासाठी संशोधक निर्मित 'शिक्षक व्यावसायिक क्षमता मापिका श्रेणी' व निरीक्षण या साधनांचा वापर करण्यात येणार आहे. हे साधन तयार झाल्यानंतर शिक्षण क्षेत्रातील तीन नैपुण्यप्राप्त तज्ज्ञांकडून प्रमाणित करुन घेतल्यानंतरच हे साधन कार्यवाहीत करण्यात येईल.

१४. संख्याकीय परिमाणे —

संख्याशास्त्रीय साधने —

प्रस्तुत संशोधनासाठी व्यावसायिक क्षमता मापिकेद्वारे प्राप्त झालेल्या माहितीनुसार अर्थनिर्वचन करण्यासाठी सरासरी, शेकडेवारी, कोष्टके, आलेख ही संख्याशास्त्रीय साधने वापरण्यात येतील.

१५. कार्यवाही –



१६. वेळापत्रक –

१. संशोधन आराखडा तयार करणे.	मार्च २०२२
२. संदर्भ साहित्याचे वाचन	मे २०२२
३. संशोधनासाठी गटाची निवड करणे	जुलै २०२२
४. संशोधनासाठी तज्ज्ञांच्या मदतीने 'शिक्षक व्यावसायिक क्षमता मापिका' तयार करणे.	जानेवारी २०२३
५. शिक्षकांच्या मापिका देउन भरुन घेणे.	ऑगस्ट २०२३
६. माहिती विश्लेषण व अर्थनिर्वचन	जानेवारी २०२४
७. प्रबंधाची तपासणी व पुनर्लेखन	डिसेंबर २०२३
८. प्रबंधाचे टंकलेखन	जानेवारी २०२४
९. प्रबंध सादर करणे	एप्रिल २०२५

१७. अंदाजपत्रक —

अ.क्र.	कामाचा तपशील	अंदाजे खर्च रु.
१.	माहिती संकलन व साधन निर्मिती	१५,०००
२.	प्रवासखर्च	४०,०००
३.	प्रत्यक्ष माहिती संकलन	४०,०००
४.	महिती विश्लेषण	५,०००
५.	अहवाल लेखन, टंकलेखन, बाईडींग, एम्बॉसिंग	५०,०००
	एकूण खर्च रुपये	**१,५०,०००**

१८. संदर्भ ग्रंथ सूची —

Best John W. & Kahn James V. (2006) , *Research in Education (Ninth Edition)*, New Delhi:Prentice Hall, Pearson Education.

Yeli R.S., *'A critical study of pre-primary education in Karnataka.'*

उपासनी एन.के., कुलकर्णी के.व्ही. (१९९६), *नवे शैक्षणिक मूल्यमापन आणि संख्याशास्त्र,* पुणे :विद्या बुक्स

कदम चा.प. (२००५), *शैक्षणिक संख्याशास्त्र*, पुणे : नूतन प्रकाशन.

भिंताडे वि.रा. (१९८९) *शैक्षणिक संशोधन पध्दती प्रथमावृत्ती*, पुणे :नूतन प्रकाशन

मार्गदर्शक	संशोधक
डॉ.गौतम रामचंद्र गायकवाड	उदयकुमार अरुण सांगळे